# वादविवाद स्पर्धा

*राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वाशिम*

द्वारा

## महाराष्ट्र राज्यातील शिक्षक अधिकारी कर्मचारी यांची राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

## शिक्षक व अधिकारी / कर्मचारी वादविवाद स्पर्धा- नियम / शर्ती व कार्यपद्धती (SOP)

**प्रस्तावना :-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र (SCERTM), पुणे यांच्या वतीने राज्यातील शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्याचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

- ☐ हा उपक्रम शिक्षण क्षेत्रातील सर्वांसाठी आपले कौशल्य आणि नवकल्पना विकसित व प्रदर्शित करण्याची एक संधी आहे.
- ☐ राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० (NEP-2020) नुसार, शिक्षकांचे सर्वांगीण व्यावसायिक सक्षमीकरण हे शिक्षणाच्या गुणवत्तेचा केंद्रबिंदू आहे आणि या स्पर्धा NEP-2020 च्या तत्त्वांना मूर्त स्वरूप देतील.
- ☐ या स्पर्धांद्वारे शिक्षकांना नवीन अध्यापन पद्धती, तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास करण्यास प्रोत्साहन मिळेल.
- ☐ सर्जनशीलता, सहयोग, संप्रेषण आणि चिकित्सक विचार (२१ व्या शतकातील कौशल्ये) यांसाठी शिक्षकांना सुसज्ज करणे, हा या उपक्रमाचा एक भाग आहे.
- ☐ या स्पर्धांमुळे शिक्षकांच्या सेवाविषयक कामगिरी उंचावेल आणि वर्गातील अध्ययन-अध्यापनाचा दर्जा सुधारेल.
- ☐ सर्वांनी सहभाग घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत विजेत्यांसाठी प्रोत्साहनपर भरपूर पारितोषिकांची तरतूद करण्यात येईल.

**स्पर्धेचा हेतू:**

वादविवाद ही एक संरचित चर्चा असते, ज्यामध्ये सहभागी व्यक्ती दिलेल्या विषयावर युक्तिवाद आणि प्रतिवाद करतात. यामुळे तार्किकता, संशोधनवृत्ती, आत्मविश्वास, विश्लेषण क्षमता, चिकित्सक वृत्ती, संवाद कौशल्य, निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होते. विद्यार्थी व शिक्षक अधिकारी-कर्मचारी यांचा बौद्धिक, शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकास होण्यास मदत होते.

उद्देश:-

१. अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांची वक्तृत्वशैली विकसित व्हावी.

२. व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा व ज्ञानात भर पडावी.

३. एखाद्या विषयाकडे/घटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक व्हावा/ विविध पैलूंची माहिती व्हावी.

४. अभिव्यक्ती कौशल्याचा विकास व्हावा.

# १. स्पर्धेची नियमावली (Rules and Regulations)

स्पर्धेची अंमलबजावणी व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी खालील नियम आणि अटी लागू राहतील:

| क्र. | नियम/अट | तपशील |
|---|---|---|
| १ | **पात्रता** | महाराष्ट्र राज्यातील केवळ ‘शालेय शिक्षण’ विभागाच्या शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी अनुदानित / अंशतः अनुदानित शाळांमधील **शिक्षक** (मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी), डायट मधील अधिकारी आणि शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, इत्यादी भाग घेण्यास पात्र आहेत. |
| २ | **स्पर्धेचे स्वरूप** | ही स्पर्धा **राज्यस्तरीय** असेल, परंतु (चाळणी प्रक्रिया) तालुका स्तर व विभाग स्तर या क्रमाने स्पर्धा घेऊन विजेत्यांना राज्यस्तरावर पाठवले जाईल. *[केंद्रप्रमुख केंद्रांतर्गत स्पर्धा घेऊन/शिक्षक कल विचारात घेऊन एका शिक्षकाला तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेकरिता नामांकित करतील, तालुकास्तरावर केंद्रस्तरावरून नामांकित झालेल्या स्पर्धकांची स्पर्धा होऊन गुणानुक्रमे प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धकांस विभागस्तरावर पाठवण्यात येईल. विभागस्तरावर स्पर्धा घेऊन गुणानुक्रमे प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धकांस राज्यस्तरासाठी (आयोजक- 'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वाशिम') येथे पाठवले जाईल.]* **महिलांना स्पर्धेमध्ये प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्यात यावे.** |
| ३ | **संघ / गट** | वादविवाद स्पर्धा **वैयक्तिक** स्वरूपात घेतली जाईल. प्रत्येक स्पर्धकाने 'विषयाच्या **बाजूने (For the Motion)**' किंवा 'विषयाच्या **विरोधात (Against the Motion)**' बोलायचे आहे. |
| ४ | **कार्यपद्धती** | सर्व स्तरावरील वाद-विवाद स्पर्धा, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था व शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने पार पडतील.<br>स्पर्धा संपूर्णपणे ऑफलाइन पद्धतीने सर्व स्तरांवर होईल. स्पर्धक प्रत्यक्षरीत्या उपस्थित राहतील.<br>वाचून दाखवणारा (बोलणारा) स्पर्धक अपात्र राहील. |
| ५ | **वेळेची मर्यादा** | प्रत्येक स्पर्धकास विषयावर आपले मत मांडण्यासाठी **एकूण ५+२ मिनिटांचा** वेळ दिला जाईल. * **४ मिनिटांनंतर:** पहिली घंटा (इशारा) * **५ मिनिटांनंतर:** अंतिम घंटा (भाषण थांबवावे) |
| ६ | **गुण वजावट** | निर्धारित **५ मिनिटांपेक्षा जास्त** वेळ घेतल्यास परीक्षकांच्या विवेकबुद्धीनुसार गुण वजा केले जातील. |
| ७ | **प्रतिवाद (Rebuttal)** | मुख्य भाषणानंतर, अध्यक्षांच्या निर्देशानुसार विरोधी गटाच्या सदस्यांकडून विचारलेल्या **प्रश्नांना उत्तर** देण्यासाठी स्पर्धकाला **१ ते २ मिनिटांचा** वेळ दिला जाईल. हे प्रश्न संक्षिप्त आणि अचूक असावेत. |
| ८ | **विषय** | १. शिक्षणातील समाजमाध्यमांचा वापर शाप की वरदान ?<br>२. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर योग्य की अयोग्य ?<br>३. ऑनलाइन शिक्षण तारक की मारक ?<br>४. आजची तरुणाई आणि उत्सवांचे स्वरूप योग्य की अयोग्य?<br>५. शिक्षणात तंत्रज्ञान तारक की मारक ?<br>६. शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांचा उद्देश प्रबोधन की मनोरंजन ? |
| ९ | **भाषा** | वादविवाद स्पर्धेसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी यांपैकी कोणत्याही एका भाषेचा वापर करावा. |
| १० | **निर्णय** | परीक्षकांचा निर्णय **अंतिम व बंधनकारक** राहील. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ११ | **वर्तणूक शिस्त आणि शिष्टाचार** | • स्पर्धकांनी वादविवादामध्ये संपूर्ण वेळ **सभ्यता आणि शिष्टाचार** पाळावा.<br>• बोलणाऱ्या स्पर्धकाला कोणीही **मध्येच थांबवू नये किंवा व्यत्यय** आणू नये.<br>• स्पर्धकांनी परीक्षकांसमोर, प्रतिस्पर्ध्यांसमोर आणि प्रेक्षकांसमोर **आदरपूर्वक** बोलावे.<br>• वादविवाद चालू असताना कोणताही अनुचित प्रकार केल्यास किंवा गैरवर्तन केल्यास स्पर्धकास अपात्र ठरवले जाईल. |
| १२ | **परीक्षक समिती** | प्रत्येक स्तरावर (तालुका, विभाग, राज्य) वक्तृत्व-वादविवाद स्पर्धा क्षेत्रातील तज्ञ / साहित्यिक / प्राध्यापक / शिक्षक इ. तीन व्यक्तींची स्वतंत्र **परीक्षक समिती** गठीत करावी. |

## मूल्यमापनाचे निकष

परीक्षक खालील निकषांवर स्पर्धकांचे मूल्यांकन करतील. प्रत्येक निकषासाठी गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल:

| अ. क्र. | **मूल्यमापनाचा निकष** | गुण (एकूण 100 पैकी) |
|---|---|---|
| 1 | **विषयाचे ज्ञान (Contents / Substance)**<br>- विषयाची सखोल माहिती आणि संशोधन.<br>- मांडलेले मुद्दे विषयाला सुसंगत आहेत का?<br>- विचार आणि युक्तिवाद किती प्रभावीपणे मांडले आहेत.<br>- मुद्द्यांना योग्य उदाहरणे आणि पुराव्यांचा आधार आहे का? | 40 पैकी गुण |
| 2 | **सादरीकरण कौशल्य (Oratory Skills)**<br>- प्रभावी आणि स्पष्ट बोलणे.<br>- भाषेवर प्रभुत्व आणि योग्य शब्दांचा वापर.<br>- आत्मविश्वास आणि प्रभावी देहबोली.<br>- आवाजातील चढ-उतार आणि वक्तृत्व शैली. | 30 पैकी गुण |
| 3 | **युक्तिवादाची रचना (Strategy / Argument Structure)**<br>- मांडलेल्या मुद्द्यांची सुसंगतता आणि योग्य रचना.<br>- विरोधकांच्या युक्तिवादाचे प्रभावी खंडन करण्याची क्षमता.<br>- वेळेचे योग्य व्यवस्थापन. | 20 पैकी गुण |
| 4 | **आत्मविश्वास (Confidence)**<br>- व्यासपीठावर आणि भाषणादरम्यान स्पर्धकाचा आत्मविश्वास.<br>- प्रश्नांना शांतपणे आणि आत्मविश्वासाने उत्तर देण्याची क्षमता. | 10 पैकी गुण |

## स्पर्धेचे वेळापत्रक:

| अ. क्र. | स्पर्धा कालावधी | स्पर्धेचा स्तर | जबाबदार कार्यालय / अधिकारी |
|---|---|---|---|
| १) | दि. 31 ऑक्टोबर 2025 | शिक्षक नोंदणी पूर्ण करणे. | केंद्रप्रमुख / केंद्र समन्वयक / URC- प्रमुख |
| २) | दि. 15 नोहेंबर 2025 (तिसरा- शनिवार) | तालुका स्तर | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था- संपर्क अधिकारी - अधिव्याख्याता व गटशिक्षणाधिकारी कार्यालय - गटशिक्षणाधिकारी |
| ३) | दि. 20 डिसेंबर 2025 (तिसरा- शनिवार) | विभाग स्तर | शिक्षण उपसंचालक कार्यालय व विभागीय जिल्ह्याची जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था. |
| ४) | दि. 17 जानेवारी 2026 (तिसरा- शनिवार) | राज्य स्तर | राज्यस्तर **(जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वाशिम)** |

## टप्पानिहाय समिती

### तालुका स्तरीय समिती

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २) | डायट संपर्क अधिकारी- | सदस्य |
| ३) | केंद्रप्रमुख (एक) | सदस्य |
| ४) | विषय साधनव्यक्ती / विशेष शिक्षक ID (एक) | सदस्य |
| ५) | मुख्याध्यापक (एक) | सदस्य |
| ६) | अनुभवी तज्ज्ञ भाषा शिक्षक (एक) | सदस्य |
| ७) | शिक्षण विस्तार अधिकारी | सदस्य सचिव |

### विभाग स्तरीय समिती

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | उपसंचालक | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) | सदस्य |
| ४) | वरिष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता | सदस्य |
| ५) | भाषा विषयाचे प्राध्यापक | सदस्य |
| ६) | भाषा विषयाचे प्राध्यापक | सदस्य |
| ७) | विभागीय जिल्ह्याच्या डायटचे प्राचार्य | सदस्य सचिव |

### राज्यस्तरीय समिती (आयोजक- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वाशिम )

| अ. क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १) | प्राचार्य, डायट वाशिम | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि. प. वाशिम | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. वाशिम | सदस्य |
| ४) | शिक्षणाधिकारी (योजना) जि. प. वाशिम | सदस्य |
| ५) | अधिव्याख्याता (एक) डायट वाशिम | सदस्य |
| ६) | गटशिक्षणाधिकारी (एक) जि. प. वाशिम | सदस्य |
| ७) | वरिष्ठ अधिव्याख्याता डायट वाशिम | सदस्य सचिव |